# Bharatiya Janata Party

C.D.O. Barrack No.1, Opp. Yogekshema, Vasantrao Bhagwat Chowk,
Nariman Point, Mumbai 400 020. Tel: 22022050


**डॉ. किरीट सोमैय्या यानी पत्रकार परिषदेत प्रसिद्ध केलेले पत्रक**

ऑक्टोबर १२, २००७

## ७/११ मुंबई बॉम्बस्फोट - मानवाधिकार आयोगाने सरकारला राहिलेल्या २१२ बळींच्या वैद्यकीय मदतीचा आणि पुनर्वसनाचा विषय तातडीने मार्गाला लावण्याचा आदेश दिला आहे.

शेवटी राज्य सरकारने मान्य केले कि ७/११ मुंबई बॉम्बस्फोटातील २१२ बळीना अद्याप वैद्यकीय मदत मिळालेली नाही.

डॉ. किरीट सोमैय्या यांच्या विनंती अर्जाच्या सुनावणीच्या वेळी मानवाधिकार आयोगाने राज्य सरकारला वैद्यकीय मदत कृत्रिम अवयव, श्रवण यंत्रे आणि शेष आर्थिक भरपाई देणे, याबाबतच्या प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचा आदेश दिला आहे. आयोगाने सरकारला १८ ऑक्टोबर २००७ पर्यंत प्रगतीचा अहवाल सादर करण्यासहि सांगितले आहे.

सरकारने नुकत्याच दिलेल्या उत्तरात कळविले आहे कि, मुंबई शहरातील ९, मुंबई उपनगर जिल्ह्यातील ६८ आणि ठाणे जिल्ह्याताल १३५ बॉम्बस्फोट बळी आर्थिक भरपाई, वैद्यकीय उपचार, कृत्रिम अवयव किंवा श्रवण यंत्रांच्या प्रतिक्षेत आहेत. राज्य सरकारने सर्व जिल्हाधिकाऱ्याना मदत आणि पुनर्वसनाच्या सर्व प्रक्रिया १५ ऑक्टोबर पर्यंत पूर्ण करण्याचा आदेश दिला आहे.

बॉम्बस्फोट बळींच्या मुख्य तक्रारी खालीलप्रमाणे आहेतः

→ कृत्रिम अवयवांची गरज

→ श्रवण यंत्रांची गरज

→ दीर्घकालीन वैद्यकीय उपचार-खर्च

→ वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती

→ आर्थिक भरपाईचे प्रलंबित प्रदान

डॉ. किरीट सोमैय्या यानी ९ ऑक्टोबर २००७ रोजी परत एकदा राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष जस्टीस एस. राजेंद्र बाबू यांची भेट घेतली. डॉ. सोमैय्या यानी बॉम्बस्फोट बळीना आवाहन केले आहे कि त्यानी प्रलंबित मदत आणि भरपाईच्या संदर्भातील आपली कागदपत्रे सलंबंधित जिल्हाधिकाऱ्याना सादर करावीत.

सरकारला आपला प्रगतीचा अहवाल १८ ऑक्टोबर २००७ रोजी दुपारी १२ वाजता महाराष्ट्र मानवाधिकार आयोगापुढे होणाऱ्या सुनावणीच्या वेळी सादर करायचा आहे.

***प्रसिद्धी सचिव***